सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ५५ | बुधवार, दि. १९ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
१९ नोव्हेंबर

- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना.
- ‘राणी लक्ष्मीबाई’ झाशीची राणी यांचा जन्म.
- ‘इंदिरा गांधी’ भारतीय पंतप्रधान आणि राजकारणी यांचा जन्म.
- ‘दारा सिंग’ भारतीय व्यावसायिक कुस्तीपटू आणि अभिनेता यांचा जन्म.
- ‘सुष्मिता सेन’ मिस युनिव्हर्स १९९४ यांचा जन्म.
- ‘रामदास कृष्ण धोंगडे’ कीर्तनकार व प्रवचनकार, ज्ञानेश्वरीचे अभ्यासक यांचे निधन.

# सोन्याचे दर १४ हजार रुपयांनी कोसळले!

## ग्राहकांची दागिने खरेदीसाठी दुकानांवर गर्दी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव शहरातील सुवर्ण बाजारपेठेत गेल्या शुक्रवार, दि. १८ नोव्हेंबरपासून सुरू असलेली सोने आणि चांदीच्या दारातील पडझड मंगळवार, दि. १८ नोव्हेंबर रोजी सुद्धा कायम राहिली. दोन्ही धातूंचे दर अचानक कोसळल्याने ग्राहकांनी दागिने खरेदी करण्यासाठी गर्दी केल्याचे शोरूममध्ये दिसून आले.

सर्वत्र लग्नाचा हंगाम सुरू झाला असताना ग्राहकांसाठी एक आनंदाची बातमी आली आहे. सुवर्ण बाजारपेठेत सोन्या- चांदीचे दर अचानक कोसळले आहेत. गेल्या आठवड्यात दोन्ही धातूंच्या दरामध्ये मोठी वाढ झाल्याचे दिसून आले होते. शुक्रवारच्या बाजारानंतर बाजार तुलनेने स्थिर राहिला होता. मात्र, नवीन आठवड्याच्या सुरूवातीसह मंगळवारी देखील दरामध्ये लक्षणीय घट झाली आहे. यामुळे खरेदीदारांचा उत्साह वाढला आहे.



सोन्या आणि चांदीचे दर गेल्या काही दिवसांपासून सातत्याने घसरत आहेत. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठा या दरावर परिणाम करीत आहेत. सुवर्ण व्यावसायिकांच्या मते चीन व जपान यांच्यातील तणाव आणि अमेरिकन फेडच्या टिप्पण्यांमुळे बाजारावर परिणाम झाला आहे.

गेल्या आठवड्यात सोन्याच्या दारात अंदाजे २. ५ टक्यांची घसरण झाली होती, तर चांदीत ५. ५ टक्क्यांनी लक्षणीय घसरण झाली होती. फेड अधिकाऱ्यांनी व्याजदर कपातीचे संकेत दिले नव्हते. एकूणच जागतिक आणि देशांतर्गत दोन्ही घटकांमुळे सोने आणि चांदीचे दर दबावाखाली आहेत. नजीकच्या काळात हे कायम राहू शकते. अमेरिकेतील टेरिफ तणाव कमी झाल्यामुळे धोकादायक गुंतवणूक साधनांमध्ये रस वाढला आहे. जेव्हा बाजारातील अनिश्चितता कमी होते, तेव्हा सोन्यासारख्या सुरक्षित, आश्रयस्थानांच्या मालमत्तेची मागणी कमी होते. यामुळे सोन्याचे आंतरराष्ट्रीय दरांमधील कमकुवतपणा आणखी वाढीस लागतो.

जळगावात सोमवारी २०६ रुपयांची किरकोळ नोंदविले गेल्याने २४ कॅरेट सोन्याचे दर ३ टक्के जीएसटीसह प्रति १० ग्रॅम १ लाख २६ हजार ६९० रुपयांपर्यंत घसरले होते. दुसऱ्या दिवशी मंगळवारी सकाळी बाजार उघडल्यावर पुन्हा प्रति १० ग्रॅम १ हजार ४४२ रुपये आणि प्रति १०० ग्रॅम १४ हजार ४२० रुपयांची घट नोंदविली गेली आहे. त्यामुळे सोन्याचे दर ३ टक्के जीएसटीसह प्रति १० ग्रॅम १ लाख २५ हजार २४८ रुपयांपर्यंत घसरले. सोन्यात पाच दिवसांत प्रति १० ग्रॅम तब्बल ५ हजार ३५६ रुपयांची घट झाल्याचे दिसून आले आहे.

### चांदीत ३ हजार ९० रुपयांनी घट

जळगाव शहरातील सुवर्ण बाजारपेठेत सोमवारी दिवसभरात २ हजार ६० रुपयांची घट झाल्याने चांदीचे दर ३ टक्के जीएसटीसह प्रति किलो एक लाख ६२ हजार ७४० रुपयांपर्यंत घसरले होते. दुसऱ्या दिवशी मंगळवारी सकाळी बाजार उघडल्यावर पुन्हा ३ हजार ९० रुपयांची घट नोंदविली गेली. त्यामुळे चांदीचे दर ३ टक्के जीएसटीसह १लाख ५९ हजार ६५० रुपयांपर्यंत घसरले. चांदीत पाच दिवसांत प्रति किलो तब्बल १० हजार ३०० रुपयांची घट झाल्याचे दिसून आले आहे.

गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!

# स्वच्छता मोहीम राबविणाऱ्या पालिकेतच अस्वच्छता!

## बेसीनचे नळ गायब, भिंतीही गुटख्याच्या पिचकाऱ्यांनी रंगल्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- नागरिकांसाठी स्वच्छतेच्या मोहिमा राबविणाऱ्या पालिकेतच स्वच्छतागृहांची दयनीय अवस्था झाली आहे. बेसीनचे नळ गायब, तर गुटख्याच्या पिचकाऱ्यांनी भींती रंगल्या आहेत. विशेष म्हणजे पालिका निवडणुकीच्या धामधुमीत उमेदवार, कार्यकर्ते व नागरिकांचा वावर वाढला असतानाही अशी स्थिती असल्याने नाराजी व्यक्त होत आहे. पालिका प्रशासनाने याबाबत गांभिर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

पालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी पालिका कार्यालयात मोठी गर्दी झाली होती. मात्र, स्वच्छतागृहांची दयनीय अवस्था पाहून सर्वसामान्य नागरिक, उमेदवार व त्यांचे समर्थक हे दृष्य पाहून चांगलेच चक्रावले आहेत. पालिकेच्या पहिल्या मजल्यावरील स्वच्छतागृहाची स्थिती अतिशय भयावह आहे. वॉश बेसिनमध्ये महिनोन- महिने जमा झालेली गुटख्याच्या पिचकाऱ्यांचा थर आणि पाणी साचले आहे. नळांचे हँडल तुटलेले आहेत. काही ठिकाणी तर पाण्याची सोयच नाही. भिंतींवर पसरलेली मलमूत्रासारखी घाण, शिंतोडे, बुरशी आणि दुर्गंधी यामुळे तेथे प्रवेश करणेच अवघड झाले आहे. स्वच्छतेसाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांचा मागमूसही नसल्याचे दिसून आले. पालिका निवडणुकीमुळे सध्या उमेदवारी अर्जांची पडताळणी, कागदपत्रांची पूर्तता आणि अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेसाठी दररोज शेकडो नागरिक, कार्यकर्ते आणि पत्रकार नगरपालिका कार्यालयात ये- जा करीत होते. मात्र, अशा वेळीही स्वच्छतागृहांची असलेली दूरवस्था ही लाजिरवाणी बाब आहे. ठिकठिकाणी स्वच्छ भारत अभियानाचे फलक लावलेले दिसून येतात. मात्र, पालिकेत असलेल्या या स्थितीकडेच अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष आहे. निवडणुकीच्या घोषणापत्रात स्वच्छता आणि सुविधा देण्याचे आश्वासन देणाऱ्या उमेदवारांनीच आता निवडून आल्यानंतर ही स्थिती सुधारावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.





(छायाचित्रे : रजनीकांत पाटील)

# दहिवद येथील निस्सीम पांडुरंग भक्त ह. भ. प. भानुदास पाटील यांचे निधन



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- तालुक्यातील दहिवद येथील रहिवासी ह. भ. प. भानुदास मोतीराम पाटील (भदाणे, वय ९३) यांचे मंगळवार, दि. १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता अल्प आजाराने निधन झाले.

ह. भ. प. भानुदास पाटील एडीआय म्हणून निवृत्त झाले होते. ते निस्सिम वारकरी होते. एकही वारी न चुकविणारे, अतिथी सत्कारात आनंद मानणारे आणि कुटुंबावर अपार प्रेम ठेवणारे म्हणून त्याची ओळख होती. त्यांची अंत्ययात्रा बुधवार, दि. १९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता दहिवद येथील राहात्या घरून निघणार आहे. त्यांच्या मागे तीन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. जळगाव ग. स. सोसायटीचे माजी व्हा. चेअरमन श्यामकांत भदाणे व वत्साई एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन चंद्रकांत भदाणे व शशिकांत भदाणे यांचे ते वडील होत.

# दहिवद येथून तब्बल नऊ गुरांची चोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- तालुक्यातील दहिवद येथील गावठाण जागेतील गोठ्यातून तब्बल ९ गुरे चोरीस गेले आहेत. ही घटना शनिवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. तालुक्यात गुरे चोरीचे सत्र सुरूच असून, चोरट्यांचा शोध घेण्याचे पोलिसांपुढे आव्हान उभे ठाकले आहे. या कारवाईने पशूपालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

गोरख चिंधु माळी यांच्या ३० हजार रुपयांच्या दोन गायी व दोन गोऱ्हे, चंद्रकांत चिंधु माळी यांची १० हजार रुपयांची एक गाय, बाजीराव आत्माराम पाटील यांची १५ हजार रुपयांची एक गाय व एक गोऱ्हा, ज्ञानेश्वर चंद्रभान गोसावी यांची १५ हजार रुपयांची दोन गुरे असे एकूण ७० हजार रुपयांची गुरे चोरांनी चोरून नेली. गोरख माळी यांच्या फिर्यादीवरून अमळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हेड कॉन्स्टेबल संदेश पाटील तपास करीत आहेत.

# सोनखेडी येथे दोन गावठी दारू हाभट्ट्या उद्‌धस्त!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- तालुक्यातील सोनखेडी येथील भिलाटी भागात पोलिसांनी मंगळवार, दि. १८ नोव्हेंबर रोजी गावठी दारू हाभट्ट्यांवर छापा टाकला. सुमारे ६० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दोन्ही आरोपींविरूद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे.



पोलिसांनी सांगितले, की पहिल्या छाप्यात सकाळी ७ वाजता सोनखेडी येथील एका घराच्या मागे सुनील गुलाब भिल (वय ४५, रा. सोनखेडी) हा लोखंडी ड्रममध्ये गुळ-नवसागराचे मिश्रण वापरून तीन चुलींवर गावठी दारू गाळत होता. यात १०० लिटर क्षमतेचा ४ हजार ५०० रुपये किंमतीचा १ लोखंडी ड्रम, २५० लिटर मिश्रित २५ हजार रुपयांचे कच्चे रसायन, ९०० रुपयांची ९ लिटर तयार गावठी दारू असे एकूण ३० हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दुसऱ्या कारवाईत सकाळी ८ वाजेच्या सुमारास पोलीस उपनिरीक्षक भगवान शिरसाठ, पोलीसनाईक राहुल पाटील यांच्या पथकाने भिलाटी परिसरात आरोपी वना रामा भिल (वय ५०) याच्या घराजवळील जागेवर छापा टाकला. या वेळी ७ प्लास्टिक ड्रम्समध्ये साठवलेले तब्बल ३५० लिटर गुळ-नवसागर मिश्रित कच्चे रसायन आढळून आले. हा साठा नष्ट करण्यात आला. पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनरिक्षक भगवान शिरसाठ, हवालदार सुनील जाधव, हेड कॉन्स्टेबर विजय भोई, पोलीस नाईक राहुल पाटील यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# टवाळखोरांकडून शाळा, महाविद्यालयातील मुलींची छेडखानी

## पालक चिंतित; बंदोबस्त करण्याची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- शहरातील विविध शाळांच्या आवारात टवाळखोरांचे घोळके दिसून येतात. शाळा, महाविद्यालय सुटण्याच्या व भरण्याच्या वेळी मुलींची छेडखानी होत असल्याच्या तक्रारी पालकांनी केल्या आहेत. पोलीसांनी बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे.

शाळा परिसर, मुख्य रस्ते आणि शाळेपासून काही अंतरावर युवकांचे टोळके असते. मुलींना हातवारे करणे, मुलींच्या मागे सुसाट मोटारसायकल चालवून त्यांना बिथरविणे. अश्लील इशारे करणे, शिवीगाळ करणे आदी प्रकार निदर्शनास येत आहेत. विशेषत शाळा सुटल्यावर सायकलने घरी जाणाऱ्या मुलींच्या टवाळखोर मागे लागतात. कॉलनी, गल्लीबोळातील रस्त्यात मुलींना गाठुन त्यांची छेडखानी करतात.

सकाळी शाळा भरण्याच्या वेळीही असे प्रकार होत असल्याचे काही पालकांचे म्हणणे आहे. ग्रामीण भागातून शहरात शिक्षणासाठी अनेक मुली येतात. अशा मुलींना बस स्थानकात टवाळखोर मुले गाठतात. अनेक मुली भीतीपोटी घरच्यांना अशा घटना सांगत नाहीत. यामुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. शाळांच्या वेळात पोलिसांची गस्त वाढवावी. टवाळखोरांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# भारताच्या शेजारील देशाच्या हाती लागला एक हजार टन सोन्याचा खजिना!

## पौराणिक कथांमधील अख्यायिका ठरली खरी!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वैज्ञानिकांनी सोन्याचा एक मोठा साठा शोधून काढला आहे. हा साठा चीनच्या शिनजियांग उइगर स्वायत्त प्रदेशाच्या पश्चिम सीमेकडील डोंगराळ भागात सापडला आहे. भूवैज्ञानिकांच्या प्राथमिक अंदाजानुसार या सोन्याच्या साठ्याचे प्रमाण १ हजार टन पेक्षा जास्त असू शकते. या शोधावर काम करणाऱ्या भूवैज्ञानिक टीमचे वरिष्ठ अभियंता हे फुबाओ आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ४ नोव्हेंबर रोजी ‘एक्टा जियोसाइंटिका सिनिका’ या सायन्स मॅगझिनमध्ये एक शोधनिबंध प्रकाशित केला आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, “ शिनजियांगच्या पश्चिम कुनकुलमध्ये एक हजार टन क्षमतेच्या सोन्याच्या क्षेत्राची रूपरेखा आता आकार घेत आहे.”

### एकाच वर्षात सापडले तीन सोन्याचे भांडार

हे चीनमध्ये एका वर्षाच्या आत सापडलेले तिसरे मोठे सोन्याचे क्षेत्र आहे. ज्याची क्षमता १०० टन पेक्षा जास्त आहे. याआधी चीनच्या ईशान्येकडील लियाओनिंग प्रांत आणि मध्य चीनमधील हुनान प्रांतातही असे मोठे सोन्याचे साठे सापडले होते. यापूर्वी जगात जे मोठे सोन्याचे साठे सापडले होते, त्यांचे प्रमाण साधारणपणे काही शेकडो टन असायचे.

### पूर्वीच्या अंदाजापेक्षा खूप मोठा

‘साउथ चायना मॉर्निंग पोस्ट’च्या अहवालानुसार, आतापर्यंत अंदाज होता, की चीनमध्ये उत्खननासाठी सुमारे ३ हजार टन सोने शिल्लक आहे. हे प्रमाण रशिया आणि ऑस्ट्रेलियामध्ये शिल्लक असलेल्या सोन्याच्या तुलनेत फक्त एक चतुर्थांश होते. मात्र, या नवीन शोधांमुळे चीनमधील सोन्याचा साठा पूर्वीच्या अंदाजापेक्षा खूप मोठा असू शकतो हे स्पष्ट झाले आहे.

### कथेतील आख्यायिका ठरली खरी

चीनच्या प्राचीन कथांमधील एक भविष्यवाणी खरी ठरली आहे. चीनच्या जुन्या कथांमध्ये कुनलुन पर्वताला एक पवित्र आणि दैवी पर्वत मानले जाते. याची तुलना अनेकदा ग्रीक कथांमधील माउंट ऑलिंपसशी केली जाते. ‘द क्लासिक ऑफ माउंटन्स अॅण्ड सीज’ या प्राचीन ग्रंथात कुनलुन पर्वताला पृथ्वीचे केंद्र आणि सर्व खजिन्यांचा भांडार म्हटले आहे. सुमारे २१०० वर्षांपूर्वी हान राजवंशाचे सम्राट वू यांनी दक्षिण- पश्चिम शिनजियांगमधील एका विशाल ड्रॅगनच्या आकाराच्या पर्वत रांगेने प्रभावित होऊन या पर्वताला अधिकृतपणे कुनलुन हे नाव दिले होते. जे आजही कायम आहे.

आधुनिक वैज्ञानिकांनीही हे सिद्ध केले आहे, की युरेशियन खंडाचे भौगोलिक केंद्र शिनजियांगमध्ये आहे. हा प्रदेश जेडसारख्या मौल्यवान खजिन्यांनी समृद्ध आहे. मात्र, कुनलुन पर्वत सोन्याने समृद्ध असल्याच्या प्राचीन कथांना अजूनपर्यंत वैज्ञानिक पुरावा मिळाला नव्हता. आता या नवीन शोधामुळे त्या कथांनाही बळ मिळाले आहे.





# श्रीदेवी-माधुरी यांना टक्कर द्यायची ‘ ही ’ सुपरस्टार

## एकतर्फी प्रेमाने करियरची लावली वाट, आता दिसतेय अशी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बॉलिवूडमध्ये अनेक अभिनेत्रींची ये-जा चालू असते. ज्या आपल्या सौंदर्य आणि अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकून घेत असतात. बऱ्याचदा या अभिनेत्री अभिनेत्यांवरही भारी पडतात. करिअर उत्तम चालू असते. मात्र नंतर संसाराच्या गाड्यात अडकल्यावर मात्र त्यांना मागे जावे लागते. आम्ही तुम्हाला अशाच एका अभिनेत्रीबद्दल सांगणार आहोत, की जिने गॉडफादरशिवाय बॉलिवूडमध्ये प्रसिद्धी मिळविली. ही अभिनेत्री म्हणजे ८० आणि ९० च्या दशकातील टॉप अभिनेत्रींमध्ये समाविष्ट असलेली मीनाक्षी शेषाद्री. या अभिनेत्रीने १९८३ मध्ये मनोज कुमार निर्मित ‘ पेंटर बाबू ’ या चित्रपटातून आपल्या करिअरची सुरूवात केली होती.



### ए-लिस्टर कलाकारांसोबत काम

मीनाक्षी शेषाद्रीने ‘ पेंटर बाबू ’ या चित्रपटातून पदार्पण केले. तिच्या दुसऱ्या चित्रपटाने तर खळबळ उडाली होती. जॅकी श्रॉफ यांच्यासोबत तिने ‘ हिरो ’ (१९८३) हा दुसरा चित्रपट केला ज्याने तिला स्टार बनविले. त्यानंतर तिने अनेक बॉलिवूड सुपरस्टार्ससोबत काम केले. आपल्या संपूर्ण कारकीर्दीत मीनाक्षी शेषाद्रीने ऋषी कपूरपासून ते अमिताभ बच्चन, मिथुन चक्रवर्ती, रजनीकांत, आमिर खान, सनी देओल आणि गोविंदा यांसारख्या सुपरहिट कलाकारांसोबत काम केले. या काळात ती दिग्दर्शकांमध्ये आवडती बनली होती. पण एकतर्फी प्रेमसंबंध आणि दिग्दर्शकासोबतच्या मतभेदांमुळे तिची कारकीर्द बरबाद झाली.

एकतर्फी प्रेमामुळे तिच्या कारकीर्दीचे नुकसान झाले. १९९० मध्ये मीनाक्षी शेषाद्रीने सनी देओल आणि दिग्दर्शक राजकुमार संतोषी यांच्यासोबत ‘ घायल ’ आणि ‘ दामिनी ’मध्ये काम केले. हे दोन्ही चित्रपट ब्लॉकबस्टर ठरले. ‘ दामिनी ’च्या शूटिंग दरम्यान राजकुमार संतोषी यांनी मीनाक्षींसमोर आपल्या भावना व्यक्त करत तिला प्रपोज केले. परंतु अभिनेत्रीने हा प्रस्ताव नाकारला. मिळालेल्या माहितीनुसार राजकुमार संतोषी यांनी मीनाक्षी शेषाद्रीला मनवण्याचा प्रयत्न सुरू ठेवला. पण यामुळे दोघांमध्ये जोरदार वाद झाला. चित्रपट निर्मात्याने ‘ दामिनी ’मध्ये तिची जागा दुसऱ्याला देण्याचा प्रयत्न केला. मात्र सिने वर्कर्स असोसिएशनच्या हस्तक्षेपानंतर ते तसे करू शकले नाहीत. नंतर त्यांनी ‘ घायल ’मध्ये एकत्र काम केले. ज्यासाठी मीनाक्षीला आधीच साइन केले गेले होते.

### मीनाक्षीने बॉलिवूड सोडले

१९९५ मध्ये मीनाक्षी शेषाद्रीने अभिनय सोडण्याचा निर्णय घेतला. ज्यामुळे तिचे चाहते निराश झाले. तिने न्यू यॉर्कमध्ये इन्व्हेस्टमेंट बँकर हरीश म्हैसूरशी लग्न केल. त्यानंतर टेक्सासमधील प्लानो येथे राहायला गेली. मीनाक्षी आणि हरीश यांना दोन मुले आहेत. एक मुलगी आणि एक मुलगा. मीनाक्षी मुंबईला ये-जा करते. अलीकडेच तिने बॉलिवूडमध्ये परतण्याची इच्छा व्यक्त केली होती.

### मीनाक्षी शेषाद्रीचे सिनेमे

आऊटसाइडर असूनही मीनाक्षी शेषाद्रीने कमी वेळात बॉलिवूडमधील सर्वांत मोठ्या अभिनेत्रींपैकी एक स्थान बनविले. आपल्या संपूर्ण कारकीर्दीत तिने ‘ मेरी जंग,’ ‘ स्वाती,’ ‘ दिलवाला,’ ‘ डकैत,’ ‘ इनाम दस हजार,’ ‘ परिवार,’ ‘ शहेनशाह,’ ‘ महादेव,’ ‘ आवारगी,’ ‘ झोर,’ आणि ‘ घर हो तो ऐसा ’ यासारखे अनेक हिट चित्रपट दिले. मीनाक्षीच्या यशामुळे ती ८० आणि ९० च्या दशकात श्रीदेवी, माधुरी दीक्षित, काजोल आणि जुही चावला यासारख्या हिट अभिनेत्रींसाठी एक स्पर्धक बनली होती.

# मूड अचानक चढ-उतार होतोय? कदाचित व्हिटॅमिन डी कमी आहे!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आज मस्त वाटते आहे. उद्या काही करू असे अजिबात वाटत नाही. कधी रडायला येते. कधी चिडचिड होते. कधी सगळे रिकामे वाटते, का बरे असे होते? कदाचित यामागे तुमचे ‘ मन ’ नाही, तर तुमचे ‘ व्हिटॅमिन डी ’ जबाबदार असू शकते.

व्हिटॅमिन डी म्हणजे फक्त हाडे नव्हेत. ‘ मनाचे ’ही पोषण. बऱ्याच जणांचा गैरसमज असतो, की व्हिटॅमिन डी फक्त हाडांसाठी लागतो.

पण खरेतर हे ‘ सनशाईन व्हिटॅमिन ’ मेंदूतील मूड केमिकल्सवरही परिणाम करते.

### व्हिटॅमिन डी आणि मेंटल हेल्थ यांचे नाते

कमी व्हिटॅमिन डी असले, की सेरेटोनिन, डोपामाईन हे ‘ हॅप्पी हॉर्मोन्स ’ कमी तयार होतात. यामुळे लो मूड, उदासीनता, चिडचिड, नैराश्य येऊ शकते. झोपेचे चक्रही बिघडते, थकवा, कंटाळा आणि बेचैनी वाढते.

### तुम्हालाही ही लक्षणे आहेत का?

सकाळी उठल्यानंतरही थकल्यासारखे वाटणे. दिवसभर निरस वाटणे किंवा काही करायची इच्छा न होणे. कोणाशी बोलायची किंवा भेटायची इच्छा होत नाही. चिडचिड वाढलेली वाटते. एकटे, उदास वाटणे. खरेतर काही त्रास नाही, मात्र बरे वाटत नाही. तर एकदा व्हिटॅमिन डी ची टेस्ट करून पाहा.

शरीर सांगत असते. मात्र आपण ऐकत नाही.

### मग उपाय काय?

सकाळी २०-३० मिनिटे उन्हात बसा. शक्यतो ८.३० च्या आधीचा सूर्यप्रकाश मिळवा. डॉक्टरांच्या सल्ल्याने व्हिटॅमिन डी सप्लिमेंट घ्या. टेस्ट केल्याशिवाय अंदाजाने घेऊ नका.

### फॅटयुक्त नैसर्गिक अन्न खा

जसे- लोणी, तूप, दूध, बदाम, बिया (फ्लॅक्स, सनफ्लॉवर).

मन शांत ठेवण्यासाठी ध्यान करा. जे मूड सुधारायला मदत करते. मन, शरीर, आणि सूर्य या तिघांचे एक खास नाते आहे.

मनाला मोकळे ठेवायचे असेल, तर शरीरात सगळ्या न्यूट्रिएन्ट्स् असाव्या लागतात. व्हिटॅमिन डी हा त्यातला एक महत्त्वाचा सोल्जर आहे.

**सक्सेस स्टोरी**

# वडिलांचे निधन तीनवेळा नापास, तरीही ती खचली नाही; अंजली चौथ्या प्रयत्नात बनली आयएफएस

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्या मुलांनी आपल्या डोळ्यासमोर यशस्वी व्हावे असे प्रत्येक वडिलांचे स्वप्न असते. असेच स्वप्न मध्य प्रदेशातील राजगड जिल्ह्यातील अंजली सोंधियाच्या वडिलांचे होते. अंजलीने अधिकारी व्हावे, असे त्यांना वाटत होते. मात्र नियतीच्या मनात काही वेगळेच होते. अंजली कठीण परिस्थितीवर मात करत अधिकारी बनली. परंतु हे यश पाहण्यासाठी तिचे वडील हयात नव्हते. आपण अंजली सोंधियाच्या संघर्षाची कहाणी जाणून घेणार आहोत.

अंजली ही मध्य प्रदेशातील राजगड जिल्ह्यातील चंद्रपुरा येथील रहिवासी आहे. तिचे वडील सुरेश सोंधिया शेतकरी होते. त्यांची मुलगी अधिकारी व्हावी, अशी त्यांची इच्छा होती. कठोर परिश्रम आणि प्रतिकुल परिस्थितीवर मात करत ती २०२४ मध्ये यूपीएससी इंडियन फॉरेस्ट सर्व्हिस (आयएफएस) परीक्षेत नववी रँक मिळविली. मात्र इथपर्यंतचा तिचा प्रवास सोपा नव्हता. तिला अनेक अडथळ्यांचा सामना करावा लागला.

आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर अंजलीने युपीएससी परीक्षा देण्याचा निर्णय घेतला. १२ वी पास झाल्यानंतर अंजली अंजली इंदूरला गेली. पदवीचे शिक्षण पूर्ण केले. याच काळात तिने यूपीएससी परीक्षेचा अभ्यास सुरू केला. तिने ऑनलाइन अभ्यास करत नोट्स बनविल्या आणि सतत अभ्यास सुरू ठेवला.

### तीन वेळा अपयश

अंजलीने २०२० मध्ये यूपीएससीची परीक्षा दिली, हा तिचा पहिलाच प्रयत्न होता. यात ती नापास झाली. हार न मानता तिने पुन्हा परीक्षा दिली, यातही ती नापास झाली. २०२३ मध्ये पुन्हा परीक्षा दिली त्यातही अपयश आले. ती पूर्वपरीक्षाही पास होऊ शकली नाही. या अपयशामुळे तिचा आत्मविश्वास कमी झाला. याच काळात तिच्या वडिलांचे निधन झाले. मात्र तरीही तिने अभ्यास सुरू ठेवला.

वडील गेल्यानंतरचा अंजलीला तो क्षण नेहमीच आठवतो. जेव्हा आर्थिक अडचणी तिच्या स्वप्नांमध्ये अडथळा आणत होत्या. तथापि, तिच्या वडिलांच्या निधनानंतर तिच्या आईने तिला अधिकारी होण्यासाठी प्रोत्साहन आणि पाठिंबा दिला. अंजली तिच्या ध्येयाकडे पुढे गेली आणि दिवसरात्र काम केले.

### चौथ्या प्रयत्नात यश

अंजलीने २०२४ मध्ये आयएफएस परीक्षा दिली आणि प्रिलिम्स उत्तीर्ण झाली. त्यानंतर तिने मुख्य आणि मुलाखतीत चांगली कामगिरी केली. परीक्षेचा निकाल जाहीर झाला तेव्हा तिचे नाव यादीच्या पहिल्या पानावर होते. यावर्षी एकूण १४३ उमेदवार आयएफएस परीक्षा उत्तीर्ण झाले होते. अंजलीचे यश तिच्या कुटुंबासाठी अभिमानाचा क्षण होता.



# हाय और हॅलो में क्या अंतर है? कब क्या बोलें-जान जाएंगे तो डेली बोलने से पहले बार-बार सोचेंगे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रोजाना बातचीत के दौरान हम कई शब्दों को प्रयोग करते होंगे। हालांकि कई बार शायद हमें कुछ शब्दों की सही मीनिंग और उनका प्रयोग करने का सही तरीका नहीं पता होता। ऐसे ही दो शब्द हाय और हॅलो हैं। आपने इन्हें बहुत सुना या बोला होगा लेकिन क्या आप जानते हैं इनके बीच अंतर क्या है? अक्सर बिना सोचे ही किसी को हाय या हॅलो बोलना आपके इम्प्रेशन को बदल सकता है। अगर आप डेली कन्वर्सेशन में इनका सही जगह इस्तेमाल सीख जाएंगे तो आप सोच-समझकर बोलेंगे। आइए जानते हैं कब क्या बोलना चाहिए और दोनों का मतलब।

### हाय और हॅलो में क्या अंतर है?

डिक्शनरी के अनुसार हाय शब्द हॅलो के समान है लेकिन इसे थोड़ा ज्यादा अनौपचारिक माना जाता है। दोस्तों, फैमिली या जिन लोगों से आप बहुत कम मिलते हैं तो उनके साथ हाय कहना ठीक है। यह शब्द छोटा, आसान और फ्रेंड लगता है। हॅलो शब्द थोड़ा फॉर्मल है। नए लोगों, ऑफिस में सीनियर्स या किसी ऑफिशियल मीटिंग में इसका इस्तेमाल ज्यादा सही माना जाता है। यह सुनने में रिस्पेक्टफुल लगता है।

### हाय कब और कैसे बोलें?

हाय को हम जिन अभिवादन में इस्तेमाल करते हैं। लेकिन यह बोलने का कैज़ुअल और फ्रेंडली तरीका होता है। हालांकि, अभी ऑफिशियल बातचीत में भी इसका उपयोग दिख सकता है। अगर आप क्लासमेट, पड़ोसी, दोस्तों और परिवार के किसी सदस्य से नॉर्मल बातचीत में इसका इस्तेमाल करते हैं तो यह ठीक है। जैसे सुबह स्कूल में दोस्त से या फिर पड़ोसी से बात के दौरान आप बोल सकते हैं- हाय! आप कैसे हो? और यह एकदम सही तरीका है।

### हाय और हॅलो का अर्थ क्या है?

हाय और हॅलो का हिंदी में अर्थ नमस्ते होता है। हालांकि, हॅलो का अर्थ ‘ सुनिए ’ भी होता है। दोनों शब्दों के सही अर्थ समझकर आप इसका इस्तेमाल सही तरीके से कर सकेंगे। इससे आपकी इंग्लिश नेचुरली लगेगी और लोगों के सामने सही इम्प्रैशन जमा सकेंगे।

### हॅलो कब और कैसे बोलें?

हॅलो शब्द फॉर्मल है। इसे बोलने या सुनने में रिस्पेक्ट दिखती है। इसकी टोन गंभीर और ध्यान देने वाली होती है। इसका प्रयोग ऑफिस में सीनियर्स या किसी ऑफिशियल मीटिंग में करना सही होता है। प्रोफेशनल कन्वर्शेसन में आप अगर किसी को पहली बार कॉल करते हैं तो ‘ हॅलो, मेरा नामहै’ बोलना ज्यादा अच्छा रहेगा। फोन पर भी अक्सर लोग हॅलो बोलते हैं। अब अगली बार जब आप किसी से मिलते हैं तो सिचुएशन को देखकर हाय या हॅलो बोल सकते हैं।

# पन्नास हजार कोटी पंचाऐंशी लाख पन्नास हजार रुपयांची संपत्ती!

## दुबईतील सर्वांत श्रीमंत भारतीय व्यक्ती; २५ देशांमध्ये २५० हायपरमार्केट, एका मॉलचा मालक आणि...



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हजारो भारतीय व्यापारी दुबई आणि संपूर्ण युएई अर्थात दुबईमध्ये स्थायिक झाले आहेत. युनिक आयडीया आणि मेहनतीच्या जोरावर यांनी प्रसिद्धी मिळविली आणि भरपूर संपत्ती जमवली आहे. रिजवान साजन, बी.आर. शेट्टी, पी.एन.सी. मेनन आणि आझाद मूपेन सारखे भारतीय दुबईतील सर्वांत श्रीमंत व्यक्ती म्हणून ओळखले जातात. पण या सर्वांमध्ये सर्वांत श्रीमंत कोण आहेत? जाणून घेऊया.

एम. ए. युसुफ अली हे दुबईतील सर्वांत श्रीमंत भारतीय व्यक्ती आहेत. त्यांची आजची एकूण संपत्ती अंदाजे पन्नास हजार कोटी पंचाऐंशी लाख पन्नास हजार रुपये इतकी आहे. ते जगातील ६६३ व्या क्रमांकाचे श्रीमंत व्यक्ती आहेत. त्यांना मध्य पूर्वेतील रिटेल किंग म्हणूनही ओळखले जाते. केरळमधील एका छोट्या गावात सुरू झालेल्या आणि जागतिक साम्राज्यात विस्तारलेली असी त्यांची यशस्वी घोडदौड आहे.

एम. ए. युसुफ अली यांचा जन्म केरळमधील एका सामान्य कुटुंबात झाला. १९७३ मध्ये ते त्यांच्या काकांचा लहान वितरण व्यवसाय सांभाळण्यासाठी अबू धाबीला गेले. तेथून त्यांनी त्यांचा किरकोळ प्रवास सुरू केला. १९९० च्या दशकात आखाती युद्धाच्या शिखरावर त्यांनी त्यांचे पहिले लुलू हायपरमार्केट उघडले. त्यावेळी किरकोळ बाजारपेठेत परिवर्तन होत होते. लहान दुकाने हायपरमार्केटमध्ये बदलत होती. युसुफ अली यांनी ही संधी ओळखली आणि हळूहळू त्यांचे साम्राज्य वाढविले. आज ते लुलू ग्रुप इंटरनॅशनलचे अध्यक्ष आहेत. ज्याचे उत्पन्न अंदाजे ६४ लाख सात कोटी रुपये आहे. ते २५ देशांमध्ये २४० हून अधिक हायपरमार्केट आणि मॉल चालवतात, ज्याचे आखाती देशांमध्ये तसेच भारत, आशिया आणि युरोपमध्ये स्टोअर आहेत.

लुलू मॉल्सची भारतात, विशेषतः दक्षिण भारतात, जेथे केरळसारखे अनेक मोठे मॉल आहेत. तेथे मोठी लोकप्रियता आहे. युसुफ अली हे कोचीन आंतरराष्ट्रीय विमानतळाचे शेअरहोल्डर देखील आहेत. त्यांच्या संचालक मंडळावर आहेत. विमानतळ सौरऊर्जेवर चालते, जे पर्यावरणासाठी एक सकारात्मक पाऊल आहे. २०२४ मध्ये त्यांनी अबू धाबी स्टॉक एक्सचेंजमध्ये त्यांचा किरकोळ व्यवसाय सूचीबद्ध केला. ज्यामुळे त्यांना १.७ अब्ज डॉलर्स किंवा अंदाजे एक लाख चाळीस हजार कोटी रुपये मिळाले. या हालचालीमुळे त्यांचे साम्राज्य आणखी मजबूत झाले. त्यांच्याकडे युरोपमध्ये मालमत्ता आहेत, ज्यात स्कॉटलंडमधील वॉल्डोर्फ अस्टोरिया हॉटेल आणि लंडनमधील ग्रेट स्कॉटलंड यार्ड हॉटेल यांचा समावेश आहे. नंतरचे एकेकाळी यूकेच्या मेट्रोपॉलिटन पोलिसांचे मुख्यालय होते. अशा आलिशान मालमत्ता त्यांच्या संपत्तीचा पुरावा आहेत.

परंतु युसूफ अली केवळ त्यांच्या व्यवसायासाठीच नव्हे, तर त्यांच्या सामाजिक कार्यासाठी देखील प्रसिद्ध आहेत. कोविड-१९ महामारी दरम्यान, त्यांनी ६.८ दशलक्ष डॉलर्स किंवा अंदाजे ५० कोटी रुपये दान केले. केरळमध्ये १४०० खाटांचे उपचार केंद्र बांधले आणि ते सरकारला सुपूर्द केले. गुजरात भूकंप, आशियाई त्सुनामी आणि पूर यांसारख्या आपत्तींमध्येही त्यांनी मदत केली.

२०१८ मध्ये त्यांनी केरळच्या पुरासाठी ९५ दशलक्ष डॉलर्स दान केले. ते प्रवासी भारतीयांच्या कल्याणासाठी देखील सक्रिय आहेत. आखाती देशांमध्ये चर्च आणि स्मशानभूमी बांधण्यास मदत करतात. भारतातील सर्वांत श्रीमंत व्यक्तींच्या यादीत युसूफ अली ४९ व्या क्रमांकावर आहेत. २०२४ मध्ये त्यांची एकूण संपत्ती ६६ हजार कोटी ६३ लाख आठ हजार रुपये होती. ती आता थोडीशी कमी होऊन पन्नास हजार कोटी पंचाऐंशी लाख पन्नास हजार रुपये झाली आहे. तरीही ते युएईमधील सर्वांत श्रीमंत भारतीय आहेत.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# भारतातील एकमेव राज्य,
## जे इंग्रजांना कधीच जिंकता आले नाही!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतावर इंग्रजांचे राज्य होते हे सर्वांना माहिती आहे. मात्र, देशात एक असे राज्य आहे, जिथे इंग्रज कधीही राज्य करू शकले नाही. हे कोणते राज्य आहे? याबाबत जाणून घेऊयात सविस्तर माहिती.

ब्रिटीशांनी १५० वर्षे भारतावर राज्य केले. या काळात शेतकरी, कामगार, व्यापारी आणि प्रत्येक जाती- धर्मांच्या लोकांना त्रास सहन करावा लागला. मात्र, एका राज्यावर इंग्रज राज्य करू शकले नाहीत. ज्याला इंग्रज कधीही गुलाम बनवू शकले नाहीत. या राज्याने कधीही ब्रिटीश राजवटीला आपल्या भूमीवर पाऊल ठेवू दिले नाही. याबाबत बऱ्यात लोकांना माहिती नाही.

भारतातील या राज्याचे नाव गोवा आहे. गोव्याचा इतिहास खूप रंजक आहे. या राज्यावर कधीही ब्रिटीशांची राजवट नव्हती. यामागे काय कारण आहे ते आपण जाणून घेऊयात. याचे कारण म्हणजे गोव्यावर पोर्तुगीजांचे राज्य होते. पोर्तुगीज इंग्रजांच्या आधी भारतात आले. त्यांनी भारतात सागरी व्यापार आणि शक्ती वाढवायला सुरुवात केली. १५४० मध्ये पोर्तुगीजांनी गोव्यावर नियंत्रण मिळविले. इंग्रजांनी पोर्तुगीजांकडून गोवा जिंकण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांना यश मिळाले नाही. भारताच्या स्वातंत्र्यानंतरही गोव्यात पोर्तुगीजांचे राज्य होते. १९६१ मध्ये गोवा भारतात सामील झाला.

# जगातील सर्वात बुटकी म्हैस साताऱ्यात
## गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद; कृषी प्रदर्शनांमध्ये बघण्यासाठी गर्दी!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जगातील सर्वांत बुटकी म्हैस म्हणून साताऱ्यातील मलवडी (ता. माण) येथील 'राधा' नावाच्या पाळीव म्हशीची 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये नोंद झाली आहे. या ठेंगण्या 'राधा'ला पाहण्याची सर्वांनाच उत्सुकता लागलेली असते. आता तर प्रत्येक कृषी प्रदर्शनात ती गर्दी खेचत आहे.

शेतकरी व पशुपालक त्रिंबक बोराटे यांच्या घरच्याच मुऱ्हा म्हशीच्या पोटी जून २०२२ मध्ये 'राधा'चा जन्म झाला. 'राधा' दोन-अडीच वर्षांची झाल्यावर तिच्या उंचीत बदल होत नसल्याचे बोराटे यांच्या लक्षात आले. त्यानंतर बोराटे यांचा कृषी पदवीधर मुलगा अनिकेत याने 'राधा'ला कृषी प्रदर्शनात सहभागी करण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीला कोणीच त्याला प्रतिसाद दिला नाही. डिसेंबर २०२४ मध्ये सोलापूर येथील सिद्धेश्वर कृषी प्रदर्शनात पहिल्यांदा 'राधा'ने सहभाग घेतला. त्यानंतर 'राधा'चा सर्वत्र बोलबाला सुरू झाला. त्यानंतर पुसेगावचे सेवागिरी, कर्नाटकातील निपाणी यांसह एकूण १३ कृषी प्रदर्शनांत खास आकर्षण म्हणून 'राधा'ला निमंत्रित करण्यात आले. जानेवारी २०२५ रोजी 'राधा'ची इंडिया बुक ऑफ रेकॉर्डसमध्येही नोंद झाली.

परभणी येथील कृषी प्रदर्शनानंतर अनिकेत याने 'राधा'च्या गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसाठी प्रयत्न सुरू केले. यात पशुधन विकास अधिकारी डॉ. शरद थोरात यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी म्हशीची पाहणी करून सप्टेंबरमध्ये अहवाल पाठवला. २८ आक्टोबर रोजी 'राधा'ची जगातील सर्वात बुटकी म्हैस म्हणून गिनीज बुक आफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली. या म्हशीसाठी ओला व सुका चारा दररोज बारा किलो, पेंड, गव्हाचे पीठ, भुसा सकाळी व सायंकाळी दोन- दोन किलो दिला जातो. तिचे वजन २८५ किलो आहे. यापुढे देशातील सर्वांत मोठ्या आणि आंतरराष्ट्रीय कृषी प्रदर्शनात 'राधा'ला सहभागी करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

**वैशिष्ट्ये–** म्हशीचे नाव- राधा, जगातील सर्वांत बुटकी पाळीव म्हैस, उंची - ८३. ८ सेंमी (२ फूट ८ इंच), ठिकाण- मलवडी, ता. माण, जि. सातारा, महाराष्ट्र.

आमची 'राधा' प्रत्येक कृषी प्रदर्शनात सर्वांचेच लक्ष वेधून घेते. सामान्य शेतकऱ्यांसह अनेक मान्यवर व तज्ज्ञांच्या आकर्षणाची ती केंद्रबिंदू ठरत आहे. 'राधा'ची नोंद 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'मध्ये झाल्यामुळे आम्हाला खूप आनंद झाला आहे. यापुढे आंतरराष्ट्रीय कृषी प्रदर्शनात 'राधा'ला सहभागी करण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे पशुपालक अनिकेत बोराटे यांनी सांगितले.





# मोबाईल मागे कॅमेऱ्याजवळ छोटे होल का असते?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रत्येकाकडे मोबाईल फोन आहे. मात्र, मोबाईल संबंधित अनेक गोष्टी आहेत, ज्या लोकांना कदाचित माहित नसतील. त्यापैकीच एक मोबाईलच्या कॅमेऱ्याजवळ असलेला एक छोटासा होल.

तंत्रज्ञान देखील बदलत आहे. कंपनी मोबाईलमध्ये काहीतरी अनोखे बनवत असते. हे होल सहसा मागच्या कॅमेरा आणि फ्लॅश लाइटजवळ कुठेतरी असते. हे होल फ्लॅश म्हणून काम करत नाही. फोटो काढत नाही किंवा कोणत्याही प्रकारचे ते बटण नाही. हे छोटे होल आवाज कमी करणारा मायक्रोफोन आहे. हा मायक्रोफोन बॅकग्राऊंडचा आवाज कमी करतो. मोबाईलच्या समोरील मायक्रोफोनचा उपयोग फक्त आवाज ऐकण्यासाठी आहे. मोबाईलच्या तळाशी चार्जिंग पॉइंट किंवा इअरफोन जॅकच्या शेजारीही असेच एक लहान होल आहे. हे होल देखील आवाज कमी करण्यासाठी आहे.

# डोंगराळे येथील बालिकेच्या हत्येप्रकरणी भीम आर्मीतर्फे तहसीलदारांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावात तीन वर्षीय बालिकेवर लैंगिक अत्याचार करून दगडाने ठेचून निर्घृण हत्या झाली आहे. या घटनेच्या निषेधार्थ येथील भीम आर्मी संघटनेने तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांना निवेदन दिले आहे. जलदगती न्यायालयात खटला चालवून आरोपीस तातडीने फाशी द्यावी, अशी मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे, की डोंगराळे गावातील बालिकेवरील अत्याचार करुन हत्या केल्या प्रकरणातील आरोपी विजय खैरनार याच्याविरुद्ध पोस्को कायद्यांतर्गत कठोर शिक्षा व्हावी. या गुन्ह्याची शासनाने दखल घेऊन त्वरित कारवाई करावी. या प्रकरणाचा खटला जलदगती न्यायालयात चालवावा. आरोपीला मृत्यूदंडाची शिक्षा मिळण्यासाठी सरकारी वकीलांकडून सक्षमपणे खटला चालवावा. अनुभवी सरकारी वकील नेमावेत. याबाबत दिरंगाई झाल्यास भीम आर्मी संघटनेतर्फे देशव्यापी आंदोलन केले जाईल. याप्रसंगी भीम आर्मीचे कृष्णकांत प्रभाकर शिरसाठ, महेश संदानशिव, प्रवीण बैसाणे, ॲड. तिलोत्तमा पाटील, रोहिणी शिरसाठ, महेंद्र पवार, प्रवीण मोरे आदींची उपस्थिती होती.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# राज्यपालांच्या हस्ते उमेश काटेंचा सन्मान!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर- येथील पत्रकार उमेश प्रतापराव काटे यांना 'राज्यस्तरीय उत्कृष्ट पदाधिकारी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. 'राजस्थान'चे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार देण्यात आला. पंढरपूर येथे झालेल्या 'व्हॉइस ऑफ मीडिया' या आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेच्या राज्य शिखर अधिवेशनात पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

यावेळी उद्योजक राणा सूर्यवंशी, इस्कॉन प्रकल्प प्रमुख प. पू. प्रल्हाद दास, अमेरिकेचे श्रीकृष्ण चैतन्य महाराज, संघटनेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, महासचिव दिव्या भोसले, राष्ट्रीय कार्याध्यक्ष संजय आवटे, प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के, प्रदेश सरचिटणीस डॉ. डिगंबर महाले आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. राज्यातील केवळ पाच तालुकाध्यक्षांना हा पुरस्कार देण्यात आला. नाशिक विभागातून उमेश काटे हे एकमेव आहेत. दरम्यान अमळनेर येथे संघटनेचे प्रदेश सरचिटणीस डॉ. डिगंबर महाले यांच्या नेतृत्वाखाली पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिर, गरजू - गरिबांना वस्तू वाटप, उत्कृष्ट गणेश मंडळाचा सन्मान, विविध समाजोपयोगी उपक्रम राबवले होते. तसेच अमळनेर येथे नुकतेच संघटनेचे 'राज्यस्तरीय केडर कॅम्प' यशस्वीरित्या पूर्ण केले होते. या सर्व कामाची दखल घेत राज्यस्तरीय निवड समितीने श्री. काटे यांची या पुरस्कारासाठी निवड केली होती. त्यांच्या या निवडीबद्दल माजी केंद्रीय मंत्री विजय नवल पाटील, नवलभाऊ प्रतिष्ठान चे कार्याध्यक्ष अनिकेत विजय पाटील, मार्गदर्शिका शिलाताई पाटील यांच्या सह अनेकांनी अभिनंदन केले आहे.






ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
' चमकण्याची '
तसेच आपली
व्यक्तिगत, राजकीय,
व्यावसायिक प्रसिद्धी
जाहिरात रूपाने
प्रचंड मोठ्या प्रमाणावर
करण्याची
सुवर्णसंधी...!

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले
महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.


# माजी नगरसेवक भावसारांसह अनेक कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर- प्रभाग क्रमांक १० मधील पानखिडकी परिसरातील भाजपचे माजी नगरसेवक कैलास भावसार यांच्यासह त्यांच्या अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करुन शिंदे शिवसेनेत त्यांनी जाहीर प्रवेश केला. यामुळे अमळनेर शहरासह तालुक्यातील शिवसेनेची ताकद वाढणार आहे.

पक्ष प्रवेशाप्रसंगी कैलास भावसार यांनी सांगितले, की ना. एकनाथ शिंदे यांची कार्यकुशलता, जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे मार्गदर्शन व माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांच्या प्रभागातील सातत्यपूर्ण विकासकामांमुळे आपण पक्षप्रवेशाचा निर्णय घेतला आहे. प्रभागातील युवकांकडून मोठा पाठिंबा मिळाल्याचेही त्यांनी सांगितले. श्री. कैलास भावसार हे यापूर्वीपासूनच माजी आमादार शिरीषदादा चौधरी यांचे कट्टर समर्थक होते. या वेळी मकरंद भावसार, सौरभ भावसार, मयूर चौधरी, ओम भावसार, गणेश चौधरी, पुष्कर चौधरी, मुकेश पाटील, हरीश भावसार, आदित्य भावसार, कुणाल खैरनार, आबा चौधरी आदी उपस्थित होते. मोठ्या संख्येने मुस्लिम बांधवांनीही प्रवेश करून या शक्तिप्रदर्शनात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला, त्यामध्ये अबिद हुसेन जाकीर, शरीफ शेख अजीज, फारूक शेख अरमान, मोशीन शेख सलीम, मुजाहिद गुलशन सैय्यद, शाहिद आरिफ शेख, रिजवान बेलदार यांचा समावेश होता. कार्यक्रमाला पंकज भावसार, श्रीराम चौधरी, गुलाब पाटील, रियाज मौलाना, अबी जाधव, अमोल भावसार, किरण बहारे, संतोष पाटील, मनोज शिंगाणे, राजगुरू महाजन, इम्रान पठाण, राहुल कंजर तसेच इतर मान्यवर आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.




# नामबाण...!

एकदा प्रभू श्रीरामचंद्र यांनी हनुमंतजींना विचारले, की ' हनुमंता, माझ्या रामबाणापेक्षा जास्त प्रभावी शस्त्र तू कुठे पाहिले आहेस काय?' याचे उत्तर नाही, असेच अपेक्षित होते. पण हनुमंत म्हणाला, की ' हो पाहिले आहे '. या उत्तरावर प्रभूंनी आश्चर्य दाखविले. ते म्हणाले, की ' माझा रामबाण ज्याला मारायचा, त्याचा कधीही न चुकता बरोबर वेध घेऊन माझ्या भात्यातपरत येतो. शिवाय तो मारलेल्याला मुक्तीही देतो. यापेक्षा दुसरे मोठे प्रभावी शस्त्र कोणते असणार?' त्यावर हनुमंतजी म्हणाले, की यापेक्षा मोठे शस्त्र मी भरताकडून घेतले आहे. रामबाणापेक्षा प्रभावी असे ते शस्त्र म्हणजे ' नामबाण '. रामबाण हा मारून मुक्ती देतो. पण नामबाण हा जीवंतपणीच मुक्ती देतो. शिवाय तो कोणतीही पीडा निर्माण करत नाही.

# सदाचाराची शिकवण



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राजा हरिश्चंद्राचे नाव कुणाला माहीत नाही? त्यांना नेहमी मुले नसल्याचे दुःख सतावत असत. खूप काळ गेल्यानंतरही जेव्हा त्यांना मुलाचे सुख मिळाले नाही तेव्हा त्यांनी नारदमुनींना व पर्वत नावाच्या ऋषींना पुत्रप्राप्तीचा उपाय विचारला. नारदमुनींनी राजाला वरुणदेवाची आराधना करण्याचा सल्ला दिला. वरुणदेवाच्या कृपेने राजाला जेव्हा पुत्रप्राप्ती झाली तेव्हा त्याने यज्ञ करण्याची प्रतिज्ञा केली. मूल झाल्यावर राजा आपली प्रतिज्ञा विसरून गेला. परंतु एके दिवशी वरुणदेवाने राजाला यज्ञाची आठवण करून दिली. तेव्हा राजा म्हणाला, " जेव्हा या मुलाला दात येतील तेव्हा मी यज्ञ करील. " हरिश्चंद्राने आपल्या मुलाचे नाव रोहित ठेवले. काही काळानंतर मुलाला दुधाचे दातही आले; मात्र राजाने यज्ञ केला नाही. त्यानंतर दुधाचे दातही तुटले व त्याला पक्के दातही आले; पण यज्ञ करण्याचे हरिश्चंद्र विसरून गेला. पुन्हा एके दिवशी वरुणदेवाने हरिश्चंद्राला आपल्या प्रतिज्ञेची आठवण करून दिली तेव्हा तो म्हणाला, " देवा, या मुलाने क्षत्रिय कुळात जन्म घेतला आहे. त्यामुळे हा जोपर्यंत क्षत्रिय कवच धारण करत नाही तोपर्यंत तो कोणताही यज्ञ करण्यासाठी योग्य समजला जात नाही. हा मुलगा जसे कवच मिळवील तेव्हा मी ताबडतोब आपल्या आज्ञेनुसार यज्ञ करील."

हळूहळू तो मुलगा सोळा वर्षांचा झाला आणि त्याने शस्त्र तसेच कवचही धारण केले. वरुणदेवाने आठवण करून दिल्यावर राजा पुन्हा म्हणाला, " देवा, तुम्ही उद्या या, तेव्हा तुमच्या आज्ञेनुसार यज्ञाची सर्व तयारी होईल."

हरिश्चंद्राने रोहितला बोलावून आपल्या प्रतिज्ञेविषयी सांगितले व म्हणाला, "मुला, तू मला वरुणदेवाच्या कृपेने झाला आहेस. त्यामुळे मी तुझ्या हातून वरुणदेवासाठी यज्ञ करू इच्छितो."

रोहितने वडिलांच्या बोलण्याकडे लक्ष दिले नाही आणि धनुष्यबाण घेऊन जंगलात निघून गेला. त्यामुळे वरुणदेव संतापले आणि त्यांच्या शक्तीच्या प्रभावामुळे हरिश्चंद्र जलोदर रोगाने आजारी पडले. जंगलात जेव्हा रोहितला वडिलांच्या आजाराविषयी माहिती झाले तेव्हा त्याने ताबडतोब जंगलातून परत येण्याचा निश्चय केला. रोहित नगराकडे येतच होता तेव्हा इंद्राने एका माणसाचे रूप घेऊन रोहितला उपदेश केला. तो उपदेश एका श्लोकाच्या माध्यमातून दिला होता. इंद्राचा उपदेश जवळजवळ पाच वर्षांनी पूर्ण झाला. तोपर्यंत रोहित त्याच्याजवळ राहून अनेक उपदेशांचा फायदा घेत राहिला.

आपल्या उपदेशात इंद्राने रोहितला सातत्याने पुढे चालत राहण्याची शिकवण दिली. गीतेतही मूळ उद्देश हाच होता, की माणसाने प्रगतीसाठी सातत्याने कर्म करीत राहिले पाहिजे. वास्तवात चालत राहणे हेच जीवन आहे कारण वाहणाऱ्या नदीच्या पाण्यात नेहमी चैतन्य आणि जीवन असते. वाहणाऱ्या वाऱ्यात प्राणाचे भंडार असते. सूर्यदेव सातत्याने चालण्याची शिकवण देत असतो. तो कधीच आळस करत नाही. भौतिक आणि आध्यात्मिक सुख प्राप्त करण्याची इच्छा ठेवणाऱ्या व्यक्तीने नेहमी अडचणींना सामोरे जात पुढे गेले पाहिजे.

जो माणूस कष्ट करत नाही, त्याला कधीही धन-संपत्ती मिळत नाही. रिकामे बसून राहिल्याने माणूस पापाचा भागीदार बनतो. माणसाने कधीच थकून बसू नये. जी माणसे धर्मासाठी तीर्थाटन करतात, त्यांची पापे स्वतःच थकून झोपी जातात. जी माणसे थकून बसतात, त्यांचे नशीबही बसून राहते आणि सातत्याने चालणाऱ्याचे भाग्य सातत्याने चमकत राहते.

इंद्राच्या उपदेशांचा रोहितवर फार खोलवर परिणाम झाला. एके दिवशी रोहितने वनात अजीगर्त मुनींना पाहिले, ते आपल्या तीन मुलांसह भुकेने व्याकूळ झाले होते. रोहितने त्यांना शंभर गायी देऊन त्यांचा एक मुलगा शुतःशेप याला यज्ञासाठी विकत घेतले. हरिश्चंद्राच्या यज्ञाला प्रारंभ झाला. त्यांच्या यज्ञात विश्वमित्र यजमान बनले. शुनःशेपाने विश्वमित्राच्या आदेशानुसार प्रजापती, अग्नी, सविता, वरुण इत्यादी देवतांची प्रार्थना केली. यज्ञाच्या प्रभावामुळे हरिश्चंद्राचे सगळे पाप नष्ट झाले. वरुणदेवानेही प्रसन्न होऊन हरिश्चंद्राला सगळ्या रोगांपासून मुक्त केले.

अशा प्रकारे इंद्राच्या उपदेशाद्वारे रोहितने जेव्हा देवांची प्रार्थना, उपासना, यज्ञ इत्यादी केले तेव्हा त्याचे जीवन यशस्वी झाले. त्याच्या जीवनात आनंदी आनंद झाला. त्यानंतर रोहितने नेहमीसाठीच आपल्या जीवनात सदाचार बाळगला.

# व्रत-वैकल्यांचे महत्त्व

व्रते दोन प्रकारची असतात. काम्यव्रत (इच्छापूर्तीसाठी) आणि मोक्षव्रत (आध्यात्मिक उन्नतीसाठी).

पंचांगात नित्यव्रतांचा उल्लेख आहे. नैमित्तिक व्रतांचे तपशील ग्रंथांतून मिळतात. ज्यात व्रतायोजन, व्रतविधी आणि फलांचे वर्णन आहे. व्रताचारामुळे जीवन उजळते, मन शांत होते आणि कुटुंब, समाज व आरोग्याशी नाते दृढ होते. व्रतांचे पाच प्रमुख अंगेसंकल्प, पूजा, दान, विशिष्ट आचार आणि चित्तशुद्धीसमजून घेऊनच व्रत करावे. यामुळे शास्त्रशुद्ध आचरणाला प्रोत्साहन मिळते आणि अंधश्रद्धा टळते.

### व्रत आणि सण-उत्सव

व्रते बहुतांशी सण आणि उत्सवांशी जोडलेली असतात. गणेशोत्सव, दुर्गापूजा, गोकुळाष्टमी, होळी हे सण सामाजिक आणि कौटुंबिक पातळीवर उत्साहाने साजरे होतात. उदा.- चैत्र प्रतिपदेला कडुनिंब आणि मोहोरांचे सेवन, वटपौर्णिमेला वटवृक्षाची पूजा, पोळ्याला बैलपूजा, नागपंचमीला नागपूजा आणि वसुबारसला गायपूजा हे सजीव सृष्टीबद्दल कृतज्ञता व्यक्त करतात. ही व्रते मानवी जीवन, प्रकृती आणि पर्यावरण यांचा समतोल साधतात.

### व्रतांचे प्रकार

व्रते उपवासात्मक आणि उत्सवात्मक अशा दोन प्रकारची असतात: **उपवासात्मक व्रते:** ऋषीपंचमीसारखी व्रते उपवासावर केंद्रित असतात.

**उत्सवात्मक व्रते:** गणेशचतुर्थी, गोकुळाष्टमी, महाशिवरात्री आणि महाएकादशी यात उपवास आणि दुसऱ्या दिवशी पारणा केला जातो.

उत्सवात्मक व्रतांना सामाजिक आणि सामूहिक स्वरूप प्राप्त झाले आहे. व्रतात अतिशयोक्ती टाळून साधेपणा ठेवावा. काळानुसार जीवनशैली बदलत आहे, त्यामुळे व्रतांचा मूळ अर्थ समजून, प्रकृतीनुसार आणि यथाशक्ती आचरण करावे.



### उपवासाचे नियम

उपवासात पाणी न पिणे प्रकृतीला हानिकारक ठरू शकते. लिंबूपाणी किंवा फलाहार घ्यावा, पण साबुदाण्याची खिचडी किंवा शेंगदाणे यासारखे पित्तवर्धक पदार्थ टाळावेत. जड पदार्थ कमी खावेत आणि व्याधी असल्यास प्रकृतीनुसार उपवासाच्या मर्यादा ठरवाव्यात. उपवासात जप, नामस्मरण आणि ध्यान यांना प्राधान्य द्यावे. वयोमानानुसार शरीराला क्लेश न देता व्रतांचे आचरण करावे.

### व्रतांचे उद्यापन

व्रतांची तीन अंगेव्रतारंभ, व्रताचार आणि व्रतोद्यापनमहत्त्वाची आहेत. उद्यापनात अभिषेक, पुण्यवाचन, हवन, ब्राह्मण-सवाष्ण-कुमारीकांना भोजन आणि यथाशक्ती दान करावे. वयाच्या पन्नाशीपूर्वी व्रतांचे काटेकोर आचरण करावे, तर वृद्धावस्थेत प्रकृतीनुसार साधना, पूजा आणि तपश्चर्या करावी.

**मौनव्रत :** आध्यात्मिक शक्ती

मौनव्रत हे अत्यंत प्रभावी आध्यात्मिक व्रत आहे. यामुळे काम, क्रोध, द्वेष, वासना यापासून मुक्ती मिळते आणि मन:शांती लाभते. ताणतणावापासून मुक्ती मिळवून सात्त्विक विचारांची जोपासना होते. मौनव्रत आठवड्यातून एकदा किंवा अष्टमी, चतुर्दशी, पौर्णिमा, अमावास्येला पाळावे. यात वाणी बंद ठेवावी, पण धार्मिक ग्रंथांचे पठन, स्तोत्र वाचन किंवा खाणाखुणा करणे निषिद्ध नाही. मौनव्रतामुळे इच्छाशक्ती आणि व्यक्तिमत्त्वात सात्त्विक बदल घडतात.

### मौनव्रताचा संकल्प

मम देह-कोशास्पद दोषांचे समूहनिवारण, काम-क्रोधादि षड्रिपूंवर नियंत्रण, मन:शांती आणि ईश्वरभक्ती वृद्धीसाठी यथावत्कालपर्यंत मौनव्रत आचरीन.

सुरूवातीला गणपती पूजन आणि स्मरण करावे. व्रत भंग झाल्यास इष्टदेवतेचा मंत्रजप करावा. मौनव्रतीचे वर्तन आदर्शवत असावे आणि जेवणात एकवाढ घ्यावी.

### ग्रहपीडा निवारणासाठी व्रते

ग्रहपीडा निवारणासाठी दत्त, देवी आणि हनुमान यांची व्रते शास्त्रात सांगितली आहेत. शनीच्या साडेसातीला मारुती उपासना फलदायी ठरते. मारुती व्रत एकवीस बुधवारी केले जाते. यात उपवास, मारुती मंदिरात मिठाचा खडा, उडीद, अकरा पानांची रुईची माळ आणि नाणे अर्पण करावे.

उडदाच्या पिठाचा दिवा लावून अकरा प्रदक्षिणा आणि मारुतीस्तोत्राचे अकरा आवर्तन करावे. अकरा बुधवार क्रम वाढवून, बाराव्या बुधवारापासून उतरता क्रम ठेवावा. यामुळे मनाचे खच्चीकरण कमी होते, सहनशक्ती वाढते आणि अनर्थ टळतात. व्रत समाप्तीनंतर उद्यापन करावे.

### व्रतांचे महत्त्व

व्रतांचे प्रमुख अंगेसंकल्प, पूजा, उपवास, दान आणि चित्तशुद्धीजीवनातील अतिरेकी विचारांना आळा घालतात. व्रतांमुळे शांती, समाधान आणि सात्त्विकता प्राप्त होते. व्रतांचा मूळ अर्थ समजून, अंधश्रद्धा टाळून आणि प्रकृतीनुसार आचरण केल्यास जीवन समृद्ध आणि अर्थपूर्ण होते.

# तुमच्याही हातात पैसा येऊनही टिकत नाही? मग वास्तुशास्त्रानुसार करा ' हे ' सोपे उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



कोणत्याही व्यक्तीला जगण्यासाठी अन्न, वस्त्र, निवाऱ्याची गरज असते. त्याप्रमाणे आता पैशांची गरज असते. कारण पैशांशिवाय या गोष्टी खरेदी करणे शक्य नाही. त्यामुळे लोक हल्ली शांत व आनंदी जीवन जगण्यासाठी दिवस-रात्र कठोर परिश्रम करतात आणि पैसा कमवतात; परंतु अनेक वेळा खूप प्रयत्न करूनही कमावलेला पैसा हातात टिकत नाही. अशा वेळी आर्थिक अडचणींमुळे माणसाला आयुष्यात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. पैशाशी संबंधित समस्यांवर मात करण्यासाठी वास्तुशास्त्रात काही उपाय सुचवण्यात आले आहेत. हे नेमके काय उपाय आहेत ते जाणून घेऊ.

### लॉकर या दिशेने ठेवा

वास्तुशास्त्रानुसार जर पैसे तुमच्या हातात टिकत नसेल, तर सर्वप्रथम तुमच्या घराच्या पश्चिम-नैर्ऋत्य-पश्चिम दिशेने लॉकर किंवा पिगी बँक ठेवा आणि त्यात दररोज काही पैसे ठेवा. असे म्हटले जाते, की असे केल्याने पैसे घरात टिकू शकतो.

### अंथरुणावर जेवण करू नका

वास्तुशास्त्रानुसार अंथरुण किंवा पलंगावर बसून जेवण केल्याने घरात गरिबी येते. घरात समृद्धी आणण्यासाठी पलंगावर जेवण करणे थांबवावे आणि बेडरूममध्ये घाणेरडी भांडी ठेवू नयेत.

### पैशाला थुंकी लावू नका

वास्तुशास्त्रानुसार घरात आर्थिक समृद्धीसाठी नोटा मोजताना त्यावर थुंकी लावू नये. जेव्हा तुम्ही कोणाकडून पैसे घेता तेव्हा ते फक्त उजव्या हाताने घ्यावेत.

### नोटा अशा धरू नका

वास्तुशास्त्रानुसार पैशांचा अपमान कधीही करू नये. वास्तुशास्त्रानुसार नोटा बोटांच्या कात्रीसारख्या स्थितीमध्ये धरू नयेत. असे केल्याने आर्थिक समस्या उद्भवू शकतात, असे म्हटले जाते.

### झाडू लपवून ठेवा

वास्तुशास्त्रानुसार झाडू हे देवी लक्ष्मीचे प्रतीक मानले जाते. घरातील झाडू नेहमी लपवून ठेवावा. लक्षात ठेवा, की झाडू कधीही पैसे ठेवलेल्या ठिकाणी किंवा पूजास्थळी ठेवू नये.

### मिठाशी संबंधित उपाय

वास्तुशास्त्रानुसार आर्थिक समस्यांपासून मुक्ती मिळविण्यासाठी घराच्या ईशान्य दिशेला असलेल्या भांड्यात मीठ ठेवणे शुभ मानले जाते.

असे केल्याने घरात धनसंपत्ती टिकून राहते, असे मानले जाते.

# मार्गशीर्ष महिन्याचे महत्त्व

**|| श्री गुरुदेव दत्त ||**
**|| श्री स्वामी समर्थ ||**
**|| येळकोट येळकोट जय मल्हार ||**

मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा हा दिवस देव दीपावली ( देवदिवाळी ) म्हणून ओळखला जातो. मुख्यतः चित्तपावनांमध्ये कुलदैवत, ग्रामदैवत यांना भजण्याचा हा दिवस होय. अत्यंत पवित्र समजल्या जाणाऱ्या मार्गशीर्ष महिन्याचा प्रारंभ होतो. याच दिवशी महाराष्ट्राचे आराध्य दैवत मल्हारी मार्तंड भैरवाचे (खंडेराया) षडरात्रोत्सव (मल्हारी नवरात्री) अर्थात चंपाषष्ठीच्या नवरात्रास प्रारंभ होत आहे.

मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेपासून शुद्ध षष्ठीपर्यंत चंपाषष्ठीचे असे सहा दिवस हे नवरात्र असते. याला षडरात्रौत्सव असे देखील अधिक संयुक्तिकपणे म्हटले जाते. जेजुरीला हा उत्सव खूप मोठ्या प्रमाणात व भक्तिभावाने साजरा होतो. याच महिन्यात दत्त जयंती येत असल्याने सर्व दत्तभक्तांमध्ये व दत्त परंपरेतील भक्तांमध्ये या महिन्याचे विशेष महत्त्व आहे. गीतेमध्ये तर स्वतः श्रीकृष्णाने म्हटले आहे, की मासाना मार्गशीर्षोऽयम्। याचाच अर्थ असा, की मार्गशीर्ष महिना माझेच (भगवान श्रीकृष्णांचे) स्वरूप आहे.

स्कंद पुराणात देखील या महिन्याचा महिमा गायला आहे. भगवान विष्णूंना प्रसन्न करण्यासाठी उपासनेसाठी हा अत्यंत अनुकूल महिना आहे. याच महिन्यातील मोक्षदा एकादशीलाच गीता जयंती असते. गीतेचा जन्मदिवस म्हणून हा दिवस साजरा करतात. त्याचप्रमाणे दत्तभक्तांसाठी सुद्धा भगवान दत्तात्रयांची उपासना, आराधना करून त्यांना प्रसन्न करण्यासाठी हा महिना अत्यंत सुयोग्य असा आहे.

मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी ते मार्गशीर्ष शुद्ध चतुर्दशी या सप्ताहात गुरुचरित्राचे पारायण केल्यास त्यास विशेष महत्त्व आहे. या सप्ताहाला श्री गुरुचरित्र सप्ताह वा श्री दत्त जयंती सप्ताह असेही म्हणतात. अशा या मार्गशीर्ष महिन्याचे महत्त्व अपरंपार आहे. त्याचे जितके वर्णन करावे तितके कमीच.

